**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २३८ । गुरुवार १८ जून २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

### शेवगाव लव जिहाद प्रकरणी जनआक्रोश मोर्चा

# मुख्य आरोपीसह पडद्या मागून साथ देणाऱ्या कडक शिक्षा करा

**आमदार संग्राम जगताप यांच्यासह प्रमुख वक्त्यांची मागणी**





**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शेवगाव–** अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगाव येथे सोहेल शेख याने एका अल्पवयीन हिंदू मुलीला धर्मांतरण करून लग्नासाठी दबाव टाकल्या कारणाने मुलीने आत्महत्या केली. या घटनेच्या निषेधार्थ आणि पीडित कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी सकल हिंदू समाज, शेवगावच्या वतीने बुधवारी भव्य हिंदू जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते क्रांती चौक दरम्यान निघालेल्या या मोर्चामध्ये हजारो हिंदू सहभागी झाले होते. या आंदोलनादरम्यान उपस्थित प्रमुख वक्त्यांनी आरोपींवर आणि त्यांना पाठीशी घालणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची मागणी केली. **मोर्चातील प्रमुख वक्त्यांची महत्त्वाची विधाने खालीलप्रमाणे:**

आमदार संग्रामभैय्या जगताप: ''ज्या जिहादी प्रवृत्तीमुळे आपल्या भगिनीला जीव गमवावा लागला, त्या मुख्य आरोपीला तर शिक्षा होईलच; पण या गुन्ह्यात पडद्यामागून त्याला साथ देणाऱ्या सर्व सहकाऱ्यांची नावे शोधून त्यांना शेवगावमधून कायमचे हद्दपार करा. अशा प्रवृत्तींना या मातीत राहण्याचा किंवा मृत्यूनंतर इथे दफन होण्याचाही अधिकार नाही.''

आमदार मोनिकाताई राजळे:''पीडित चिमुकलीला आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या आरोपीला केवळ सामान्य शिक्षा न होता थेट फाशीचीच शिक्षा झाली पाहिजे. लव्ह जिहाद आणि धर्मांतराविरोधातील हा लढा केवळ या मोर्चापुरता मर्यादित नसून तो पुढेही असाच सुरू राहील. तसेच शेवगाव परिसरातील अवैध गुटखा विक्री आणि इतर बेकायदेशीर धंदे, जे या समाजकंटकांकडून चालवले जातात, त्यावर प्रशासनाने तात्काळ पूर्ण बंदी घालावी.''

नानासाहेब वाघमारे (उपाध्यक्ष, पश्चिम महाराष्ट्र): ''लव्ह जिहादच्या जाळ्यात अडकून आपल्या अनेक हिंदू मुलींना जीव गमवावा लागत आहे. आता फक्त मोर्चे काढून थांबण्याची वेळ राहिलेली नाही, तर अशा प्रवृत्तींचा वेळीच बंदोबस्त करणे गरजेचे आहे.''

सागर बेग (हिंदू कार्यकर्ते): राष्ट्रीय श्रीराम संघटनेच्या वतीने पीडित कुटुंबाला आधार म्हणून ५१,००० रुपयांची आर्थिक मदत जाहीर करण्यात आली. तसेच सकल हिंदू समाज आणि बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांमार्फत पीडित कुटुंबाला जीवनावश्यक किराणा सामग्री घरपोच देऊन मदत सुरू करण्यात आली आहे.

# कवडे मळा खून प्रकरणाचा एलसीबीकडून छडा

**चार आरोपींना बेड्या । जमिनीच्या वादातून घटना**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर शहरातील कवडे मळा भागात घडलेल्या खळबळजनक लक्ष्मण काळे खून प्रकरणाचा स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या २४ तासांच्या आत छडा लावला आहे. याप्रकरणी पोलिसांनी देहेरे शिवारातील खंडोबाचा मळा येथून चार आरोपींना शिताफीने अटक केली असून, जमिनीच्या वादातून हा खून झाल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. लक्की ऊर्फ बाबा राहुल वैराळ (वय १९, रा. विळद घाट, अहिल्यानगर), करण विशाल शिंदे (वय १८, रा. गवळीवाडा, विळद, अहिल्यानगर), गणेश ऊर्फ गणीबाबा मनोज चावरे ■ पान ४ वर



**जमिनीच्या वादातून खून केल्याची कबुली**

आरोपींकडे कसून चौकशी केली असता, मुख्य आरोपी लक्की वैराळ याने जमिनीच्या वादातून आपल्या इतर साथीदारांच्या मदतीने हा गुन्हा केल्याची कबुली दिली.

# मतदारसंघात आल्यास खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांची धिंड काढू...

**शिवसैनिकांचा संतप्त पवित्रा..**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शिर्डी –** शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खा.भाऊसाहेब वाकचौरे शिंदे गटाच्या संपर्कात गेल्याने व ऑपरेशन टायगरमध्ये वाकचौरे यांचं नाव आल्याने शिर्डी लोकसभा मतदारसंघातील ठाकरे गटाचे शिवसैनिक संतप्त झाले असून गद्दार भाऊसाहेब वाकचौरे यांना शिर्डी ■ पान ४ वर



# शहरात विद्यार्थिनींसाठी अद्ययावत वस्तीगृह उभारण्यासाठी जागेची मागणी

**माध्यमिक शिक्षक सोसायटीचे आमदार संग्राम जगताप यांना निवेदन । शिक्षक सभासदांच्या मुलींच्या शिक्षणासाठी सुरक्षित निवासाची गरज; उच्च शिक्षणासाठी शहरात येणाऱ्या विद्यार्थिनींना दिलासा देण्यासाठी होस्टेल प्रकल्पाचा प्रस्ताव**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना उच्च शिक्षणासाठी शहरात येताना निवासाच्या अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याने त्यांच्यासाठी सुरक्षित, सुसज्ज आणि अद्ययावत वस्तीगृह उभारण्यासाठी जागा देण्याची मागणी माध्यमिक शिक्षक सोसायटीच्या वतीने आमदार संग्राम जगताप यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. नगर शहरालगत १० ते १५ गुंठे जागा उपलब्ध करून देण्यात यावे, अशी मागणी शिष्टमंडळाने केली आहे.

यावेळी पद्मश्री पोपटराव पवार यांची उपस्थिती होती. तसेच माध्यमिक शिक्षक सोसायटीचे चेअरमन आप्पासाहेब शिंदे, संचालक बाबासाहेब बोडखे, महेंद्र हिंगे, सुरज घाटविसावे, संचालिका वैशाली दारकुंडे, प्रा. सुधाकर सुंबे आदी पदाधिकारी यांनी या प्रश्नाबाबत आमदार जगताप यांचे लक्ष वेधले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, माध्यमिक शिक्षक सोसायटीचे हजारो शिक्षक सभासद राज्यभर कार्यरत आहेत. त्यांच्या मुला-मुलींना उच्च शिक्षणासाठी अहिल्यानगर शहरात येणे आवश्यक ठरते. मात्र अनेक शिक्षक कुटुंबांकडे शहरात स्वतः ची राहण्याची व्यवस्था नसल्याने विद्यार्थिनींना सुरक्षित निवासाचा प्रश्न भेडसावत असतो. खासगी वसतिगृहे आणि भाड्याच्या घरांचा वाढता खर्चही पालकांसाठी आर्थिक भार ठरत असून, ■ पान ४ वर

# कल्याण रोड परिसरात वाढत्या घरफोडी व गुन्हेगारीमुळे पोलीस गस्त वाढवा

**नगरसेवक पै.महेश लोंढे यांच्यासह नागरिकांच्या शिष्टमंडळाचे विभागीय पोलीस अधिकारी यांना निवेदन । रात्रीच्या वेळी संशयास्पद हालचालींमुळे नागरिक भयभीत**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर शहरातील कल्याण रोड परिसरात घरफोडी, चोरी आणि इतर गुन्हेगारी घटनांमध्ये वाढ होत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः गणेशनगर, माधवनगर, भावना-ऋषी सोसायटी आणि साईराम सोसायटी परिसरातील रहिवाशांनी आपल्या सुरक्षेबाबत चिंता व्यक्त करत पोलीस प्रशासनाने या भागात गस्त वाढवावी, अशी मागणी केली आहे.

या पार्श्वभूमीवर नगरसेवक पै. महेश लोंढे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने शहराचे विभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांची भेट घेऊन या मागणीचे निवेदन सादर दिले. यावेळी परिसरातील नागरिक उपस्थित होते. वाढत्या गुन्हेगारी घटनांमुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना आणि परिसरातील कायदा व सुव्यवस्थेबाबतच्या समस्या याकडे शिष्टमंडळाने अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले.



निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, कल्याण रोड भागातील गणेशनगर, माधवनगर, भावना-ऋषी सोसायटी आणि साईराम सोसायटी परिसरात मागील काही काळात घरफोडी, चोरी तसेच इतर गुन्हेगारी प्रकारांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे नागरिकांच्या मनात भीती निर्माण झाली असून विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे.

नागरिकांनी सांगितले की, रात्रीच्या वेळी या भागात संशयास्पद व्यक्तींची वर्दळ वाढल्याचे दिसून येत आहे. काही ठिकाणी अपरिचित व्यक्तींच्या हालचालींबाबत नागरिकांनी चिंता व्यक्त केली असून त्यामुळे रहिवाशांना सतत असुरक्षिततेची भावना निर्माण होत आहे. या परिस्थितीमुळे नागरिकांनी पोलीस प्रशासनाकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली आहे. शिष्टमंडळाने निवेदनात दि. १६ फेब्रुवारी २०२६ रोजी शिवाजीनगर परिसरातील कवडे मळा येथे घडलेल्या खुनाच्या घटनेचाही उल्लेख केला. अशा गंभीर घटनांमुळे नागरिकांमध्ये ■ पान ४ वर

# जामखेड बनावट दूध रॅकेट, सात अटकेत

**संतोष मुटकुळे यांनी एलसीबीचा पदभार घेताच मोठी कारवाई**





**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जामखेड तालुक्यातील फक्राबाद येथे बनावट दूध निर्मितीचे रॅकेट उघडकीस आले. आतापर्यंत ७ जणांना अटक करण्यात आली आहे. पोलिस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी एलसीबीचा पदभार स्वीकारल्यानंतर गुन्ह्याच्या तपासाला गती आली असून, एक रात्रीत सात संशयितांना पोलिसांनी अटक केली. आता अटक आरोपींची संख्या १४ झाली आहे.हरिदास एकनाथ गोपाळघरे (वय ३४, रा. नागोबाचीवाडी, ता. जामखेड), सद्दाम कमरूद्दीन शेख (वय २९), चंद्रकांत आण्णा बर्डे (वय ३६, दोघे रा. उंबरे, ता. राहुरी), महेश तुकाराम मोकाटे (वय २५, रा. इमामपूर, ता. अहिल्यानगर), लक्ष्मण पोपट करंजुले (वय ३१, रा. पाडळी रांजणगाव, ता. पारनेर), किशोर काशिनाथ पुंड (वय ४६, रा. भोकर, ता. श्रीरामपूर), सर्जेराव काशिनाथ म्हसे (वय ४५, रा. शिलेगाव, ता. राहुरी), अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत.एलसीबी आणि अन्न व औषध प्रशासन विभागाने संयुक्त कारवाई करीत १४ फेब्रुवारी रोजी छापा घालून बनावट दुधाचे रॅकेट उघडकीस आणले. एलसीबीचे तत्कालीन पोलिस निरीक्षक किरण कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक समीर अभंग यांनी गुन्ह्याचा तपास करून ४१ संशयित निष्पन्न केले. गेल्या चार महिन्यात त्यात केवळ सात जणांना अटक करण्यात आली दरम्यान, पोलिस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी एलसीबीचा पदभार स्वीकारल्यानंतर गुन्ह्याच्या तपासाला गती मिळाली. एलसीबीच्या पथकाने एक रात्रीत वरील सात संशयितांना अटक केली. आता अटक आरोपींच्या संख्या १४ झाली आहे. तपासात संशयितांनी बनावट दूध निर्मितीसाठी आवश्यक रसायने, पावडर आणि अन्य साहित्याचा पुरवठा केल्याचे निष्पन्न झाले आहे. काही संशयितांनी घातक रसायनांपासून ■ पान ४ वर

# लाचेच्या सापळ्यात तीन पोलिस सापडल्याने श्रीगोंद्यात खळबळ

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** लाचेच्या सापळ्यात एकाच वेळी तीन पोलिस सापडल्याने श्रीगोंदा तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. त्यामुळे श्रीगोंदा पोलिसांच्या कार्यक्षमतेवर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे.

दादा म्हस्के, नितीन गाडगे, राजू जाधव असे लाच स्वीकारणाऱ्या तीन पोलिसांची नावे आहेत. आढळगाव येथील एक पिडीत कुटुंबाकडून अपघाताच्या गुन्ह्यात तीन्ही पोलिसांनी सहकार्य करण्यासाठी १० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली. त्यावर तडजोड होऊन त्यावर ७ हजार रुपये देण्याचे निश्चित झाले. त्यानुसार तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केल्यावर आज दुपारी पोलिस उपाधीक्षक अजित त्रिपुटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक आल्हाट यांनी लाचेचा सापळा लावून कारवाई केली.




त्यावेळी हे तिघे पोलिस लाच स्वीकारतांना पकडले गेले.

यावेळी एकाच वेळी तीन पोलिस लाचेच्या सापळ्यात सापडल्याची वार्ता श्रीगोंदा तालुक्यात वाऱ्यासारखी पसरली. यावेळी नागरिकांनी पोलिस ठाण्यासमोर मोठी गर्दी केली होती.

## दै. आकर्षण निवडक

### खास हृदयरोगी रूग्णांसाठी मोफत तीन दिवसीय 'निरोगी हृदय - आदर्श जीवनपध्दती कोर्स'



अहिल्यानगर- येथील आनंदऋषीजी मेडिटेशन सेंटर (ब्लड बँकेच्या खाली) मध्ये तीन दिवसीय 'निरोगी हृदय-आदर्श जीवनपध्दती कोर्स'चे आयोजक करण्यात येत आहे. सदर कोर्स प्रिव्हेंटिव्ह कार्डिओलॉजी डिपार्टमेंटच्या वतीने घेण्यात येत आहे. त्यांना ब्रह्माकुमारीज् संस्था तसेच रोटरी क्लब ऑफ अहमदनगर रोटरी पीस अ‍ॅन्ड हार्मनी सेंटर यांचे सहकार्य लाभत आहे. अशी माहिती आनंदऋषीजी हॉस्पिटलचे व्यवस्थापक डॉ. आशिष भंडारी यांनी दिली.सदर कोर्स २३,२४,२५ जुन २०२६ रोजी रोज सकाळी ९ ते ११.३० या कालावधीत घेण्यात येणार असुन यामध्ये सुप्रसिध्द हृदयरोगतज्ज्ञ डॉ. अनिकेत कटारिया, डॉ. राहुल अग्रवाल, डॉ. अमित भराडीया तसेच राजयोगा जीवनपध्दतीच्या अभ्यासक बी के राजराजेश्वरी, बी के डॉ. सुधा कांकरिया हे मार्गदर्शन करणार आहेत असे प्रतिपादन समन्वयक डॉ. सुधा कांकरिया यांनी केले. हा कोर्स म्हणजे हृदयरोगी रूग्णांसाठी एक सुवर्णसंधी असुन यामध्ये निरोगी हृदयासाठी आदर्श जीवनपध्दती विषयक स्लाईड शो व्दारे मार्गदर्शन करण्यात येणार आहे. हृदयरोग का होतो? तो कसा टाळता येतो? आहार-विहार-व्यवहार कसा असावा? मानसिक ताणतणाव यापासुन कशी सुटका करावी? हृदयाची रचना व त्याचे कार्य कसे चालते? हृदयामध्ये ब्लॉकेज कसे तयार होतात? ते कसे टाळता येतात? ई सी जी, एन्जीओग्राफी म्हणजे काय? ताणतणावमुक्त जीवन जगण्यासाठी राजयोगा मेडिटेशनचा कसा उपयोग करता येतो. याची सविस्तर माहिती उदाहरणासहित स्पष्ट करण्यात येणार आहे. हृदयविकार होण्याचे ७०% कारण मानसिक प्रदुषण आहे व ३०% चुकीची आहार पध्दती व व्यायामाचा अभाव हे आहे. त्यात अनियमित झोप, मधुमेह, उच्च रक्तदाब, मोटापा, धुम्रपान, व्यसन, रक्तात वाढलेली कोलेस्ट्रॉलची पातळी, अनुवांशिकता हे घटक हृदयरोग बळावण्यासाठी कारणीभूत ठरतात यांनाच रिस्क फॅक्टर म्हणतात. २०१५ च्या अहवालाप्रमाणे सुमारे ६२ मिलीयन व्यक्ती भारतात हृदयविकाराचे शिकार झाले आहेत. त्यामधील ३७ मिलीयन व्यक्तींचे वय ५० वर्षापेक्षा कमी आहे. त्यातील २.९ मिलीयन व्यक्ती हृदयरोगामुळे दरवर्षी मृत्यु पावतात. गेल्या काही दशकात जवळपास ३००% पेक्षा जास्त हृदयरोगाचे रूग्ण भारतात वाढले आहेत. हे चित्र भयावह आहे. याचा वेळीच बंदोबस्त केला पाहिजे. यासाठीच 'निरोगी हृदय-आदर्श जीवनपध्दती' या कोर्सचे आयोजन केले आहे असे हृदयरोगतज्ज्ञ डॉ. अनिकेत कटारिया यांनी सांगितले. सदर कोर्स मोफत असुन नांवनोंदणी करणे मात्र आवश्यक आहे. दिनांक २० जुन २०२६ पर्यंत नांवनोंदणी करायची आहे. एका हृदयरोगी रूग्णासमवेत एक नातेवाईक असणे आवश्यक आहे. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रोटरीचे अध्यक्ष रो. सुभाष गर्जे, सचिव रो. आदिनाथ ठोंबे प्रयत्नशील आहेत. तरी जास्तीत जास्त व्यक्तींनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन आंनदऋषीजी हॉस्पिटलच्या वतीने करण्यात येत आहे. नांवनोंदणीसाठी प्रिया दिदी ९८५०८८७८३८ येथे त्वरीत संपर्क साधावा.

### जनादेशाशी गद्दारी करणाऱ्या खासदारांना 'राष्ट्रीय भ्रष्टांजली'!

अहिल्यानगर - मतदारांनी एखाद्या विशिष्ट पक्षाची विचारसरणी, धोरणे आणि कार्यक्रम यांवर विश्वास ठेवून निवडून दिलेले खासदार सत्तेच्या मोहापोटी अथवा वैयक्तिक लाभासाठी आपल्या पक्षाचा त्याग करून सत्ताधारी पक्षात सामील होत असतील, तर अशा लोकप्रतिनिधींना पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसदेच्या वतीने प्रतीकात्मक 'राष्ट्रीय भ्रष्टांजली' वाहण्यात येईल, अशी घोषणा करण्यात आली आहे.ही मोहीम कोणत्याही व्यक्तीविरोधात नसून लोकशाहीला पोखरणाऱ्या भ्रष्ट आणि स्वार्थी मानसिकतेविरोधात असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे.शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या लोकसभेतील सहा खासदारांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील पक्षात प्रवेश करण्याबाबत सुरू असलेल्या चर्चांच्या पार्श्वभूमीवर पीपल्स हेल्पलाईन, भारतीय जनसंसद आणि जनलोक अदालत यांच्या वतीने लोकशाही मूल्यांच्या संरक्षणाचा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे.जनतेने दिलेला जनादेश ही कोणत्याही लोकप्रतिनिधीची वैयक्तिक मालमत्ता नसून सार्वजनिक विश्वासाची अमानत आहे. त्यामुळे त्याचा वापर सत्तावाटप, राजकीय सौदेबाजी, संपत्ती, प्रतिष्ठा अथवा वैयक्तिक फायद्यासाठी केला जाऊ नये, अशी भूमिका संघटनेने मांडली आहे.

# बँकॉक येथे भारतीय पॉवरलिफ्टिंगपटूंचे सुवर्णमय कामगिरी; देवदत्त गुंडू यांची पाच सुवर्णपदकांवर मोहोर



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** थायलंडमधील बँकॉक येथे १३ व १४ जून २०२६ रोजी पार पडलेल्या डब्ल्यूआरपीएफ आयर्न वर्ल्ड चॅम्पियनशिप २०२६ या जागतिक पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी दमदार कामगिरी करत देशाचा तिरंगा अभिमानाने फडकावला. या स्पर्धेत ११५ किलो वजन गटातील विभागात सहभागी झालेल्या देवदत्त प्रवीण गुंडू यांनी अप्रतिम ताकद, चिकाटी आणि सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर तब्बल पाच सुवर्णपदके पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले.

देवदत्त गुंडू यांनी स्पर्धेतील संपूर्ण पॉवरलिफ्टिंग प्रकार-प्रकार अशा पाचही प्रकारांमध्ये प्रतिस्पर्ध्यांवर वर्चस्व गाजवत सुवर्णपदकांची कमाई केली. जागतिक स्तरावरील या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत मिळविलेले हे यश भारतीय शक्तीउचल क्षेत्रासाठी अत्यंत गौरवास्पद मानले जात आहे.

देवदत्त गुंडू हे अनेक वर्षांपासून पॉवरलिफ्टिंग खेळामध्ये सातत्याने उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. यापूर्वी रशिया येथे झालेल्या डब्ल्यूआरपीएफ जागतिक पॉवरलिफ्टिंग अजिंक्यपद स्पर्धेत त्यांनी रौप्यपदक पटकावून भारताला मान मिळवून दिला होता. तसेच व्हिएतनाम येथे झालेल्या डब्ल्यूआरपीएफ आशियाई पॉवरलिफ्टिंग अजिंक्यपद स्पर्धेत एक सुवर्ण आणि एक कांस्यपदक जिंकून आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली गुणवत्ता सिद्ध केली होती. राष्ट्रीय स्तरावरील विविध अजिंक्यपद स्पर्धांमध्येही त्यांनी अनेक सुवर्णपदके, चषक आणि मानचिन्हे प्राप्त केली आहेत.

देवदत्त गुंडू यांच्या यशामागे कठोर परिश्रम, शिस्तबद्ध सराव आणि खेळाप्रती असलेली निष्ठा हे महत्त्वाचे घटक आहेत. त्यांनी स्वतः उत्कृष्ट खेळाडू म्हणून नाव कमावतानाच अनेक खेळाडूंना प्रशिक्षण देऊन त्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर घडविण्याचे कार्यही केले आहे.

त्यांचे शिष्य किशोर यशवंत शिंदे यांनीदेखील या स्पर्धेत शानदार कामगिरी करत ९० किलो वजन गटातील मास्टर-१ विभागात सुवर्णपदक पटकावले. जागतिक स्पर्धेतील हे यश त्यांच्या सातत्यपूर्ण सरावाचे आणि प्रशिक्षक देवदत्त गुंडू यांच्या प्रभावी मार्गदर्शनाचे फलित मानले जात आहे. किशोर शिंदे यांनी यापूर्वी रशिया येथे झालेल्या जागतिक पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले होते. तसेच दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेतही त्यांनी सुवर्णपदक प्राप्त करून आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे.

या दोन्ही खेळाडूंच्या यशामुळे भारतीय पॉवरलिफ्टिंग क्षेत्राला नवी प्रेरणा मिळाली असून, महाराष्ट्रासह संपूर्ण देशातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर भारताचा झेंडा अभिमानाने फडकविणाऱ्या या खेळाडूंनी युवा पिढीसमोर आदर्श निर्माण केला आहे. या यशाबद्दल देवदत्त गुंडू यांनी यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले. त्यांच्या मार्गदर्शन, प्रोत्साहन आणि सहकार्यामुळे भारतीय खेळाडूंना जागतिक स्तरावर आपली क्षमता सिद्ध करण्याची संधी मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

जागतिक स्पर्धेत मिळविलेल्या या ऐतिहासिक यशामुळे देवदत्त गुंडू आणि किशोर शिंदे यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, त्यांच्या या सुवर्णमय कामगिरीने भारतीय क्षेत्राच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. त्यांच्या यशामुळे अनेक युवकांना खेळाकडे आकर्षित होण्याची प्रेरणा मिळणार असून भविष्यातही ते देशासाठी अशीच गौरवशाली कामगिरी करतील, असा विश्वास क्रीडाप्रेमींनी व्यक्त केला आहे.

# नगरकल्याण (माळशेज) रेल्वे मार्ग : शेतकऱ्यांचे स्वप्न की अजूनही कागदावरील रेषा?



**संतोष कोरडे**
उपसंपादक,
दै. आकर्षण, पारनेर
मो. ९६३७६३३८७८

अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यासह टाकळी ढोकेश्वर, भाळवणी, बेल्हे, आळेफाटा, ढवळपुरी आणि परिसरातील नागरिकांच्या मनात अनेक वर्षांपासून एकच प्रश्न घर करून आहे नगरकल्याण (माळशेज) रेल्वे मार्ग नेमका कधी होणार? अनेक वेळा सर्वेक्षण झाले, घोषणा झाल्या, चर्चा रंगल्या; पण प्रत्यक्षात रेल्वेची शिट्टी अद्याप ऐकू आलेली नाही. त्यामुळे हा मार्ग वास्तवात उतरणार की केवळ कागदावरील रेषाच राहणार, अशी खंत जनतेच्या मनात आहे.

पारनेर तालुक्याचा मोठा भाग हा पठारी आणि दुष्काळग्रस्त म्हणून ओळखला जातो. येथे कालव्याचे किंवा पाटाचे पाणी फारच मर्यादित आहे. बहुतांश शेती विहिरींवर आणि पावसावर अवलंबून आहे. त्यामुळे शेतकरी हंगामी पिके, भाजीपाला आणि फळबागांच्या माध्यमातून आपला उदरनिर्वाह करतो. मात्र उत्पादित मालाला योग्य बाजारपेठ मिळवताना वाहतुकीचा खर्च आणि वेळ ही मोठी अडचण ठरते.

नगरकल्याण रेल्वे मार्ग प्रत्यक्षात आला तर या भागाचे चित्रच बदलू शकते. टाकळी ढोकेश्वर, भाळवणी, बेल्हे, आळेफाटा परिसरातील शेतकरी आपला भाजीपाला, फळे आणि इतर कृषी उत्पादने थेट कल्याण, मुंबई आणि महानगरांच्या बाजारपेठेत कमी वेळेत पोहोचवू शकतील. आज ज्या मालाला ट्रक किंवा पिकअपने अनेक तास लागतात, तो रेल्वेमुळे जलद आणि कमी खर्चात बाजारात पोहोचेल.

या रेल्वेमार्गाचा फायदा केवळ शेतीपुरता मर्यादित राहणार नाही. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी, युवकांना रोजगारासाठी, व्यापाऱ्यांना व्यवसायासाठी आणि रुग्णांना उपचारांसाठी मुंबईकल्याण परिसर गाठणे अधिक सोपे होईल. आज अनेकांना प्रवासासाठी रस्तेमार्गावर अवलंबून राहावे लागते. रेल्वेमुळे हा प्रवास अधिक सुरक्षित, जलद आणि किफायतशीर होऊ शकतो.

विशेष म्हणजे माळशेज घाट परिसर पर्यटनाच्या दृष्टीनेही महत्त्वाचा आहे. हा रेल्वे मार्ग सुरू झाल्यास पर्यटनाला चालना मिळेल, स्थानिक व्यवसाय वाढतील आणि रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील. त्यामुळे हा प्रकल्प केवळ वाहतुकीचा नाही, तर संपूर्ण प्रदेशाच्या आर्थिक विकासाचा मार्ग ठरू शकतो.

मात्र वर्षानुवर्षे चर्चा आणि सर्वेक्षणांनंतरही प्रकल्पाची गती अत्यंत संथ असल्याचे दिसते. त्यामुळे नागरिकांच्या अपेक्षा हळूहळू निराशेत बदलत आहेत. प्रत्येक पिढीने या रेल्वे मार्गाची चर्चा ऐकली, पण प्रत्यक्ष काम पाहण्याचे भाग्य मात्र लाभले नाही. त्यामुळे आता केवळ घोषणा नव्हे, तर ठोस कृतीची गरज आहे.

नगरकल्याण रेल्वे मार्ग हा पारनेरच्या दुष्काळी आणि पठारी भागासाठी विकासाची नवी जीवनवाहिनी ठरू शकतो. शेतकऱ्यांच्या घामाला योग्य बाजारपेठ, विद्यार्थ्यांना संधी, उद्योगांना चालना आणि सर्वसामान्यांना सुलभ प्रवास देणारा हा प्रकल्प आता प्रत्यक्षात येणे ही काळाची गरज आहे.शेवटी एकच प्रश्न उरतो नगरकल्याण रेल्वे मार्गाचे स्वप्न पुढील पिढ्यांनाही दाखवायचे, की या पिढीच्या डोळ्यांसमोर ते वास्तवात उतरवायचे?

## बोधगया महाबोधी महाविहार केंद्रीय कायदा पुस्तक प्रकाशन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अ‍ॅड. दिलीप काकडे लिखित "बोधगया महाबोधी महाविहार केंद्रीय कायदा" पुस्तकाचा प्रकाशन समारंभ डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन सीवुड नवीमुंबई येथे रविवार दि. १४ जून २०२६ रोजी संपन्न झाला. भदंत थेरो महेंद्र बोधी यांचे हस्ते पुस्तकाचे प्रकाशन झाले. या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती, आयु. काशिनाथ कांबळे, हरिश्चंद्र पवार, दादासाहेब मर्चंडे, डॉ. मुकेश दुपारे, शशिकांत भालेराव, संदिप साबळे , अहिल्यानगर जिल्ह्याचे समन्वयक - भाऊसाहेब देठे, डॉ अनिल ससाने, प्रा. विश्वासराव कांबळे , प्रा. साहेबराव गायकवाड यांची होती. पुस्तकाचे लेखक अ‍ॅड. दिलीप काकडे यांनी पुस्तकाचा विषय, उद्देश, स्वरुप, व वैशिष्टय याचे स्पष्टीकरण केले.

बोधगया मंदिर कायदा, १९४९, हा राज्यस्तरीय कायदा रद्द करुन, त्या जागेवर "बोधगया महाबोधी महाविहार व्यवस्थापन व सरंक्षण कायदा" या शिर्षका अंतर्गत केंद्रीय कायदा करुन, महाबोधी महाविहाराची मालकी, व्यवस्थापन, संरक्षण, नियंत्रण व प्रशासन भारतातील बुद्ध विहार, उपासक संघ, आणि भिक्खू संघ यांच्या राष्ट्रीय स्तरावर स्थापन होणाऱ्या प्रतिनिधींचे केंद्रीय मंडळ यांच्या ताब्यात देणे हा पुस्तकाचा विषय असल्याचे स्पष्ट केले. तसेच केंद्रीय कायदयाच्या मागणीचे स्पष्टीकरण करणे आणि भारत सरकार, राष्ट्रपती व प्रधानमंत्री यांना सादर केलेला केंद्रीय कायदयाचा मसुदा पुस्तकरुपाने भारतीय बौद्ध समुदायालाही सादर करणे. हा पुस्तक प्रकाशनाचा उद्देश असल्याचे स्पष्ट केले.

## लिटिल फ्लॉवरमध्ये शिक्षण व संस्कारांचा संगम - महापौर

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी प्री स्कूलपासूनच त्यांना चांगले शिक्षण आणि संस्कार मिळावे यासाठी विशेष प्रयत्न करणाऱ्या आणि नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणाऱ्या लिटिल फ्लॉवर प्री स्कूलची चौथी शाखा गुलमोहोर रोडवरील नवले नगर परिसरात नवीन शैक्षणिक वर्षात खुली झाली आहे. पालक वर्गाच्या आग्रहास्तव जास्तीत जास्त चिमुरड्यांना उत्तम दर्जाचे शिक्षण मिळावे या उद्देशाने या नवीन शाखेचा शुभारंभ करण्यात आला.

या शाखेच्या उद्घाटन प्रसंगी महापौर ज्योतीताई गाडे, नगरसेविका गौरीताई बोरकर, नगरसेवक ऋग्वेद गंधे, माजी उपमहापौर गणेश भोसले, नगरसेवक प्रकाश भागानगरे, बाकलीवाल फौंडेशन ट्रस्टचे सीए कमल बाकलीवाल, शाळेच्या संचालिका मनिषा बोगावत, विशाल बोगावत आदी उपस्थित होते.

महापौर ज्योतीताई गाडे, नगरसेविका गौरीताई बोरकर यांनी लिटिल फ्लॉवर प्री स्कूलच्या तीनही शाखांचे कौतुक केले. या प्री स्कूलमध्ये मुलांना हसतखेळत शिक्षणाची गोडी लावली जाते. संस्कार, नीतिमूल्यांचे बिजारोपण केलं जाते. त्यामुळे भविष्यात सक्षम विद्यार्थी घडण्यास मदत होते. चौथ्या शाखेतूनही हीच चांगल्या शिक्षणाची परंपरा जपली जाईल अशा शब्दांत त्यांनी शुभेच्छा दिल्या.

ऋग्वेद गंधे म्हणाले, मनिषा बोगावत अनेक वर्षांपासून सुसंस्कृत पिढी घडविण्याचे काम करत आहेत. याठिकाणी मुलांना खूप कमी वयात शिक्षणाची आवड निर्माण होते. त्यांचे कलागुण विकसित होतात. अतिशय सुरेख उपक्रम राबविण्यात येत असल्याने देशाचे सुजाण नागरिक घडण्यास मदत होते.

गणेश भोसले म्हणाले, बोगावत दाम्पत्य समर्पित भावनेने शिक्षण क्षेत्रात योगदान देत आहेत. त्यांची प्रत्येक शाखा आदर्शवत आहे. ते जिथे जातात तिथे आपल्या कार्याचा ठसा उमटवून प्रभागाची शान वाढवतात.प्रकाश भागानगरे म्हणाले, शहरातील इमारत कंपनी येथून सुरू झालेल्या लिटिल फ्लॉवरचा शहराच्या विविध भागात विस्तार होत आहे. चांगल्या वातावरणात मुलं आनंददायी शिक्षण घेत असल्याने पालकही विश्वासाने मुलांना येथे प्रवेश घेऊन देतात.

उपस्थित पालकांनी लिटिल फ्लॉवर प्री स्कूलच्या चौथ्या शाखेचे स्वागत करून सर्व टिमला शुभेच्छा दिल्या.

मनिषा बोगावत म्हणाला, लिटिल फ्लॉवर प्री स्कूलच्या प्रत्येक शाखेला पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिलाय आहे. त्यामुळेच शाखा विस्तार केला आहे.

### पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व आमदार संग्राम जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त

# विद्यार्थ्यांसाठी दंत आरोग्य तपासणी व शालेय साहित्य वाटप

**वाढदिवस समाजकार्यासाठी साजरा व्हावा; शिक्षण व आरोग्य हीच खरी गुंतवणूक – डॉ. सुमित नलवडे**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि शहराचे आमदार संग्राम जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त स्मित डेंटल अँड स्किन वर्ल्डच्या वतीने प्रसिद्ध दंततज्ज्ञ डॉ. सुमित नलवडे यांनी सामाजिक बांधिलकी जपत विद्यार्थ्यांसाठी विशेष उपक्रम राबविला. गुलमोहर रोड येथील आनंद विद्यालयात विद्यार्थ्यांची मोफत दंत आरोग्य तपासणी करण्यात आली तसेच गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांच्या दातांची तपासणी करून त्यांना दातांची योग्य निगा कशी राखावी, तोंडाचे आरोग्य कसे जपावे आणि भविष्यातील दंतविकार टाळण्यासाठी कोणती काळजी घ्यावी याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरला.

यावेळी बोलताना डॉ. सुमित नलवडे म्हणाले की, "लहान वयातच दातांचे आरोग्य जपण्याची सवय लागणे अत्यंत महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांनी नियमित दातांची स्वच्छता ठेवली तर भविष्यातील अनेक दंतविकार टाळता येऊ शकतात. तोंडाचे आरोग्य हे संपूर्ण शरीराच्या आरोग्याशी निगडित असल्यामुळे बालपणापासूनच योग्य सवयी विकसित होणे गरजेचे आहे.

ते पुढे म्हणाले की, "वाढदिवस केवळ शुभेच्छा, हार-तुरे आणि सत्कारापुरता मर्यादित न राहता समाजोपयोगी कार्यातून साजरा व्हावा, हा संदेश या उपक्रमाच्या माध्यमातून देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. समाजातील गरजू घटकांपर्यंत पोहोचून त्यांना मदतीचा हात देणे हीच खरी वाढदिवसाची भेट आहे.

शिक्षणाच्या महत्त्वावर भाष्य करताना डॉ. नलवडे म्हणाले की, "आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगामध्ये शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. स्पर्धेच्या या युगात टिकून राहायचे असेल तर प्रत्येक विद्यार्थ्याने शिक्षण घेणे अत्यावश्यक आहे. अनेक गरजू कुटुंबातील विद्यार्थी आर्थिक अडचणींमुळे शैक्षणिक साहित्यापासून वंचित राहतात. अशा विद्यार्थ्यांना शालेय साहित्य उपलब्ध करून देणे आणि त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.

ते पुढे म्हणाले की, "विद्यार्थी हे उद्याच्या भारताचे उज्ज्वल भविष्य आहेत. त्यांना योग्य मार्गदर्शन, प्रोत्साहन आणि आवश्यक मदत मिळाली तर ते देशाच्या विकासात मोलाचे योगदान देऊ शकतात. समाजामध्ये वावरत असताना समाजाचे काहीतरी देणे लागते, या भावनेतून सकारात्मक दृष्टिकोन ठेवत आणि सामाजिक बांधिलकी जपत आम्ही आमचे कर्तव्य पार पाडत आहोत.

## अहिल्यानगर महानगरपालिकेत आयएएस दर्जाचा कार्यक्षम आयुक्तांची नेमणूक करावी



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** महानगरपालिका होऊन १५ वर्ष झाली.अहिल्यानगर शहराची आज बबजपूरी झाली असून अहिल्यानगर शहराची अत्यंत दुरावस्था झालेली दिसत आहे.शहरातील वाढती अतिक्रमणे, अस्वच्छता, वाढती वाहतूक कोंडी,अकार्यक्षम आरोग्यविभाग, विस्कळीत पाणीपुरवठा,शहराच्या भविष्याचा विचार न करता बांधकाम परवाने देणे,अवैध बांधकामाचा सुळसुळाट आणि भ्रष्ट कामाबद्दल न बोललेले बरे,अशा प्रकारे महानगरपालिकेत मोठ्या प्रमाणात अंदाधुंदी कारभार सुरू आहे.महानगरपालिकेचे अत्यंत बिकट अवस्था झालेली दिसत आहे.शहरातील अनेक समस्या सुटलेल्या दिसत नाहीत.अहिल्यानगर महानगरपालिकेला सध्या आयुक्त यशवंत डांगे असुन त्यांना जवळपास ३ वर्षे होतील.तरी देखील अहिल्यानगर शहराचा विकास झालेला दिसत नाही.तर ते भकास झाले आहे.हीच भावना नगरकरांच्या मनात आहे.

मुंबई येथे मंत्रालयात भाजपचे ज्येष्ठ नेते तथा पंडित दीनदळ परिवार प्रतिष्ठानचे संस्थापक वसंत लोढा यांनी मुख्यमंत्री नामदार देवेंद्र फडणवीस यांची समक्ष भेट घेऊन अहिल्यानगर महानगरपालिकेच्या आयुक्तपदी आयएएस दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करावी याबाबतचे पत्र दिले आहे.

अहिल्यानगर शहराचा विकासाचा दृष्टिकोन ठेवून तसेच लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार दिलेले अधिकारी काय काम करू शकतात हे नगरकरांनी पाहिले आहे. कोणत्याही प्रकारे तडजोड व वशिलेबाजी न करता शहराच्या विकासासाठी कार्यक्षम आयएएस दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक अहिल्यानगर महानगरपालिकेच्या आयुक्तपदी करावी.अशी मागणी वसंत लोढा यांनी केली आहे.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### डॉ. रुचिल सप्तर्षी अंतिम एमबीबीएस परीक्षेत उत्तीर्ण



अहिल्यानगर : पुणे येथील प्रतिष्ठित बी. जे. वैद्यकीय महाविद्यालय व ससून सर्वोपचार रुग्णालय येथून डॉ. रुचिल सप्तर्षी यांनी अंतिम एमबीबीएस परीक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण केली असून, लवकरच ते वैद्यकीय इंटर्नशिपला प्रारंभ करणार आहेत.अहिल्यानगरशी अनेक पिढ्यांपासून घट्ट नाते असलेल्या सप्तर्षी परिवारातील डॉ. रुचिल हे अहिल्यानगरचे ज्येष्ठ व सर्वपरिचित कै. ॲड. गजानन सप्तर्षी व कै. प्रमिलाबाई सप्तर्षी यांचे नातू आहेत. ते राजेंद्र व प्राची सप्तर्षी यांचे सुपुत्र असून, दोघेही सुशिक्षित कमर्शियल आर्टिस्ट आहेत आणि कर्णबधिर आहेत. शिक्षणाविषयीची त्यांची निष्ठा, जिद्द आणि मुलांना दिलेली सातत्यपूर्ण प्रेरणा यांच्या बळावर त्यांनी आपल्या दोन्ही मुलांना वैद्यकीय क्षेत्रात घडविले. रुचिल यांचे ज्येष्ठ बंधू डॉ. वरद सप्तर्षी हे मुंबई येथे सल्लागार फेसिअल सर्जन ( ) तसेच देशभरातील विशेषीकृत फेसिअल प्लास्टिक व कॉस्मेटिक सर्जरी क्लिनिक साखळीचे वैद्यकीय संचालन प्रमुख ( ) म्हणून कार्यरत आहेत. कर्णबधिर पालकांच्या दोन्ही मुलांनी वैद्यकीय क्षेत्रात यश मिळविल्याने हा संपूर्ण परिवारासाठी अभिमानाचा क्षण ठरला आहे. जिद्द, शिक्षणाची ताकद आणि कुटुंबाच्या पाठबळातून यश संपादन करता येते, याचे हे प्रेरणादायी उदाहरण आहे. डॉ. रुचिल यांच्या या यशाबद्दल अहिल्यानगर व पुणे येथील नातेवाईक, मित्रपरिवार आणि हितचिंतकांनी त्यांचे अभिनंदन करून त्यांच्या भावी वैद्यकीय कारकिर्दीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.

### स्वर्गीय प्रीती बोगावत यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ मोफत निसर्गोपचार व आरोग्य मार्गदर्शन शिबिर



अहिल्यानगर - स्वर्गीय प्रीती प्रतीक बोगावत यांच्या पावन स्मृतिप्रीत्यर्थ त्यांच्या प्रथम मासिक पुण्यस्मरण दिनानिमित्त तसेच विवाहदिनाच्या औचित्याने आयोजित करण्यात आलेले मोफत निसर्गोपचार व आरोग्य मार्गदर्शन शिबिर मोठ्या उत्साहात व भावनिक वातावरणात संपन्न झाले. सहकार महर्षी श्री सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्था, रनरागिणी महिला प्रतिष्ठान आणि वंदे मातरम् युवा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने पतसंस्थेच्या सभागृहात या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या प्रारंभी स्वर्गीय प्रीती बोगावत यांना उपस्थितांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. त्यानंतर आरोग्य वर्धिनी निसर्गोपचार केंद्राच्या डॉ. हेमा शेलोत आणि रनरागिणी महिला प्रतिष्ठानच्या अध्यक्षा मिनल ईश्वर बोरा यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी जैन ओसवाल पतसंस्थेचे माजी चेअरमन ईश्वर बोरा यांनी मनोगत व्यक्त करताना स्वर्गीय प्रीती बोगावत यांच्या आठवणींना उजाळा दिला. त्यांनी सांगितले की, प्रीतीभाभी या केवळ एक व्यक्ती नव्हत्या, तर त्या धैर्य, जिद्द आणि सेवाभावाचे मूर्तिमंत उदाहरण होत्या. संकटांशी लढताना त्यांनी नेहमीच पुढाकार घेतला आणि इतरांनाही प्रेरणा दिली. याच त्यांच्या लढाऊ वृत्तीमुळे त्यांना सर्वजण प्रेमाने ''रणरागिणी'' म्हणून ओळखत असत. वंदे मातरम् युवा प्रतिष्ठानच्या महिला आघाडीला ''रणरागिणी महिला प्रतिष्ठान'' हे नावही त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून प्रेरणा घेऊन देण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. आज आयोजित करण्यात आलेले हे आरोग्य शिबिर त्यांच्या स्मृतींना अभिवादन करणारे आणि समाजोपयोगी कार्याचा संदेश देणारे असल्याचे त्यांनी सांगितले.यानंतर प्रतीक बोगावत यांनी अत्यंत भावुक शब्दांत आपल्या भावना व्यक्त केल्या. पत्नी प्रीती यांच्या कॅन्सरविरुद्धच्या लढ्याच्या काळात निसर्गोपचार, योग्य आहार-विहार आणि सकारात्मक जीवनशैलीमुळे त्यांना शारीरिक व मानसिक वेदनांपासून काही प्रमाणात दिलासा मिळाला होता, असे त्यांनी सांगितले. त्या काळात निसर्गोपचाराचे महत्त्व त्यांनी जवळून अनुभवले.

#### मोदींच्या बचत आवाहनास प्रतिसाद, भाजपद्वारे राज्यभरात होतेय प्रसिद्धी

## नगरच्या दोन लेकींनी केले...गॅस व तेल वाचवून ९ खाद्यपदार्थ



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** जागतिक युद्धामुळे भविष्यात दिसणार्या महागाईच्या संकटावर मात करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी संसाधन बचत करण्याच्या केलेल्या आवाहनास नगरमधील पूजा पौरस गिल्डा व पूजा निष्णात गिल्डा या दोन लेकींनी सकारात्मक प्रतिसाद दिला. या दोघींनी चक्क स्वयंपाकाचा गॅस आणि खाद्यतेलाचा अजिबात वापर न करता तब्बल नऊ खाद्यपदार्थ केले. या पदार्थांची दखल प्रदेश भाजपच्या महिला आघाडीच्या अध्यक्ष चित्राताई वाघ यांनी घेतली व राज्यभरातील भाजप महिला जिल्हाध्यक्ष आणि तालुकाध्यक्षांच्या माध्यमातून या खाद्यपदार्थांचे व ते तयार करण्याच्या प्रक्रियेचे व्हीडीओ घरा-घरातील महिलांपर्यंत पोहोचवले आहेत. दोन्ही पूजा गिल्डा या नगरमधील भाजप महिला आघाडीच्या पदाधिकारी निवृत्त मुख्याध्यापिका गीता गिल्डा यांच्या सुना आहेत. त्यामुळे दोन्ही पूजांचे कर्तृत्व गिल्डा परिवाराचे राज्यभरातून कौतुक करवून जात आहे.

जागतिक युद्धामुळे निर्माण होत असलेल्या परिस्थितीवर मात करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बचतीचे आवाहन केले आहे. याअनुषंगाने केंद्र सरकारद्वारे इंधन संरक्षण एवंम् खाद्यतेल बचत जागरूकता अभियान हाती घेतले आहे. या अभियानांतर्गत नुकतेच महिला प्रदेशाध्यक्षा चित्राताई वाघ यांनी राज्यभरातील प्रमुख महिला पदाधिकार्यांसाठी ऑनलाईन मार्गदर्शन शिबीर घेतले. यात दिल्लीच्या तज्ज्ञ महिलांद्वारे प्रत्येक महिलेने स्वतः च्या घरापासून बचतीची सवय अंगिकारण्याचे आवाहन केले गेले. याअनुषंगाने आपल्या घरापासून बचतीची सुरुवात कशी करता येईल, यावर गीता गिल्डा यांनी दोन्ही सुना... पूजांशी चर्चा केली.

या तिघींनी त्यावर विचार करून तांदूळ न वापरता व फक्त भिजवलेले ओटस् वापरून केलेला कर्ड राईस-विदाऊट राईस व पनीर-कोथिंबीर-पुदिना वापरून केलेले ग्रीन डीप सँडवीच अशा दोन पदार्थांचा व्हीडीओ करून तो चित्राताईंना पाठवला. त्यांनी राज्यस्तरीय महिला पदाधिकारी तसेच भाजपचे प्रदेशाध्यक्ष आ. रवींद्र चव्हाण यांच्यासमोर त्याचे सादरीकरण केले. त्यांच्याकडून हिरवा कंदील मिळाल्यावर मुंबई भाजपचे विशेष चित्रीकरण पथक नगरला गिल्डा यांच्या घरी आले व त्यांच्या या अनोख्या कुकरी शोचे चित्रीकरण केले गेले. या उपक्रमात दोन्ही पूजांनी तब्बल ९ पदार्थ बनवले. ते करण्यासाठी खाद्यतेल वा गॅस वापरण्याची गरज पडली नाही. फक्त नाचणीचे थालीपीठ करण्यासाठी त्यांनी इंडक्शन इलेक्ट्रिक शेगडी वापरली.

**घरगुती साहित्यातून निर्मिती**

दोन्ही पूजांनी घरगुती साहित्य व कच्च्या भाज्यांपासून बहुतांश खाद्यपदार्थ बनवले. भिजवलेल्या ओटस्पासून दही-भातासारखा कर्ड राईस विदाऊट राईस, भिजवलेली मटकी-मूग व मखाणा वापरून

## दुर्गादेवी विद्यालयात नवागत विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**ढवळपुरी–** अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे श्री दुर्गादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, ढवळपुरी येथे नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी नव्याने प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांचे ढोल-ताशा, लेझीम व झांज यांच्या गजरात तसेच फुलांचा वर्षाव करून उत्साहपूर्ण स्वागत करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य आदम शेख होते. यावेळी केंद्रप्रमुख चव्हाण विशेष शिक्षक विश्वास भाटे पर्यवेक्षक सुधीर चव्हाण, शाळा व्यवस्थापन समितीचे अशोक फलके, अनिल गावडे, सचिन गावडे, साहेबराव राठोड, भाऊसाहेब भुसारी,संदीप चव्हाण, दादा चौधरी, आबा वाघ, विलास आव्हाड,आदी मान्यवर उपस्थित होते. शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी विद्यालय परिसरात रंगीबेरंगी रांगोळ्या, फुग्यांनी सजविलेले खांब व आकर्षक वर्गसजावट करण्यात आली होती. नवप्रवेशित विद्यार्थ्यांना नवीन पाठ्यपुस्तके, पेन देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. दीर्घ उन्हाळी सुट्टीनंतर विद्यालयात दाखल झालेल्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता.

यावेळी इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणारा विद्यार्थी उदयनराज दरेकर यास ढवळपुरीचे माजी सरपंच डॉ. राजेश भनगडे यांचे पाच हजार रुपयांचे बक्षीस प्रदान करण्यात आले. कार्यक्रमात बोलताना प्राचार्य आदम शेख यांनी नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करताना विद्यालयात दर्जेदार शिक्षणाबरोबरच विविध स्पर्धा परीक्षा, क्रीडा स्पर्धा आणि इतर उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवून विद्यालयाची गुणवत्ता उंचावण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे सांगितले. तारकपूर व पारनेर आगाराच्या बससेवेमुळे परिसरातील वाड्या-वस्त्यांवरील विद्यार्थ्यांना विद्यालयात येणे सुलभ झाले असून, अनेक विद्यार्थी 'लालपरी'ने प्रवास करून विद्यालयात दाखल झाले होते. पर्यवेक्षक सुधीर चव्हाण यांनी मनोगत व्यक्त करत नवगतांचे स्वागत केले. यावेळी सहादू भोंडवे,संतोष व्यवहारे, राहुल झावरे, भगवान राऊत ,रवींद्र पायमोडे, सुभाष अडसूळ, सुरेश नवले, तुकाराम हराळ, अरविंद कुमावत,वर्षा शेळके, हर्षा जायभाये,निशा भोंडवे, दादाभाऊ डोळस, शब्बीर शेख, राम चौरे यमाजी झेंडे,फारुक शेख विश्वनाथ चौधरी, संदीप राठोड, संदीप पवार उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अमोल ठाणगे यांनी केले. सूत्रसंचालन अजित सांगळे यांनी केले तर आभार

## शाळा प्रवेशोत्सव क्र. २ उत्साहात संपन्न

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर यतीमखाना अँड बोर्डिंग संचलित झकेरिया आघाडी प्राथमिक शाळा, अहिल्यानगर येथे शाळा प्रवेशोत्सव क्र. २ व नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका सौ. शमीम पठाण उपस्थित होत्या, तर मा. जाकीर भाई वायरमेन हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. नवागत विद्यार्थ्यांचे पुष्प देऊन




स्वागत करण्यात आले तसेच गणवेश, वह्या व शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले.

यावेळी शिक्षक अन्सार सर यांनी शिक्षण, शिस्त व नैतिक मूल्यांचे महत्त्व विद्यार्थी व पालकांना पटवून दिले. प्रमुख पाहुणे मा. जाकीर भाई वायरमेन यांनी विद्यार्थ्यांना नियमित अभ्यास, चांगले संस्कार व कठोर परिश्रमाचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका सना पालकर यांनी केले, तर शिक्षिका ईशा तांबोळी यांनी प्रास्ताविक केले. शिक्षिका अफशान शेख यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमास शिक्षिका काजल व शिक्षिका झेबा यांचीही उपस्थिती लाभली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षकवृंद, पालक व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

## वर्षभरापासून शोधात असलेली अल्पवयीन मुलगी, आरोपीसह पोलिसांच्या ताब्यात

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** बिडकीन पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या अपहरणाच्या गुन्ह्यातील मागील एक वर्षापासून शोधात असलेली अल्पवयीन मुलगी व तिला पळवून नेणाऱ्या आरोपीला पोलिसांनी वाळुंज एमआयडीसी परिसरातून ताब्यात घेतले आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बिडकीन पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४५३/२०२५ अन्वये कलम १३७ (२) भारतीय न्याय संहिता (बीएनएस) अंतर्गत गुन्हा दाखल आहे. या गुन्ह्यातील अल्पवयीन मुलगी व आरोपी संदीप लक्ष्मण मोरे यांचा मागील वर्षभरापासून शोध सुरू होता. पोलीस पथकाने केलेल्या सातत्यपूर्ण शोध मोहिमेदरम्यान दोघेही वाळुंज एमआयडीसी परिसरात असल्याची माहिती मिळाल्यानंतर सापळा रचून त्यांना ताब्यात घेण्यात आले. बुधवारी (दि. १७) त्यांना बिडकीन पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले. या प्रकरणात पुढील कायदेशीर कारवाई सुरू असून, तपास पोलीस करीत आहेत.

## पैठण तालुक्यातील शेतकऱ्यांना ७.३४ कोटींचा पीकविमा मंजूर

### आमदार विलास भुमरे यांच्या पाठपुराव्याला यश; लवकरच खात्यात जमा होणार रक्कम

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे नुकसान झालेल्या पैठण तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत ७ कोटी ३४ लाख रुपयांचा पीकविमा मंजूर करण्यात आला आहे. ही रक्कम लवकरच पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

खरीप हंगाम २०२५-२६ मध्ये तालुक्यातील तूर व कांदा पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीकविमा मिळावा यासाठी आमदार विलास भुमरे यांनी राज्य शासन, कृषी विभाग तसेच संबंधित विमा कंपनीकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. या प्रयत्नांना अखेर यश आले आहे.

प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत अनेक शेतकऱ्यांनी तूर व कांदा पिकांचा विमा उतरवला होता. मात्र नुकसान होऊनही विमा भरपाई मिळण्यास विलंब होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण होते. याची दखल घेत आमदार भुमरे यांनी संबंधित यंत्रणांकडे वारंवार पाठपुरावा केला. मिळालेल्या माहितीनुसार, तूर पिकासाठी ४९.३५ लाख रुपये, तर कांदा पिकासाठी ६८४.७८ लाख रुपये अशी भरपाई मंजूर झाली आहे. एकूण ७३४.१३ लाख रुपये (७.३४ कोटी) पीकविमा मंजूर करण्यात आला असून ही रक्कम टप्प्याटप्प्याने शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होणार आहे. या निर्णयामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून आगामी हंगामाच्या तयारीसाठीही मदत होणार आहे.

## अनिकेत गाडेकर भारतीय सैन्यात लेफ्टनंटपदी नियुक्त

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** येथील रहिवासी अनिकेत शिवाजी गाडेकर चार वर्ष खडतर प्रशिक्षण घेऊन नॅशनल डिफेन्स अकॅडमी आणि इंडियन मिलिटरी अकॅडमी यशस्वीरित्या पूर्ण केले आहे.

वडील शिवाजी गाडेकर व आई सुनीता गाडेकर यांनी आपल्या मुलाच्या शिक्षणासाठी अहोरात्र कष्ट करून मुलाचे शिक्षण पूर्णत्वास नेले व मुलानेही आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवली व अत्यंत खडतर प्रशिक्षण घेऊन कष्टाची चीज केले व स्वतःबरोबरच आई-वडिलांचा कौतुक सोहळा व मानसन्मान मिळवून नाव मोठे केले नुकतीच भारतीय सैन्य दलात



लेफ्टनंटपदी नियुक्ती झाली. देहरादून येथे झालेल्या एका विशेष कार्यक्रमात राष्ट्रपती दौपदी मुमु यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला अनिकेत गाडेकर यांची १३ जून २०२६ रोजी इंडियन मिलिटरी अकॅडमी देहरादून येथे लेफ्टनंट पदी त्यांची नियुक्ती झाली.

## पैठणमध्ये महाराणा प्रताप जयंती उत्साहात साजरी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** वीर शिरोमणी महाराणा प्रताप यांच्या ४८६ व्या जयंतीनिमित्त पैठण शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यानिमित्त महाराणा प्रताप यांच्या पवित्र प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उपस्थितांनी अभिवादन केले.



यावेळी महाराणा प्रताप यांच्या शौर्य, पराक्रम, स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठेच्या प्रेरणादायी कार्याचे स्मरण करण्यात आले. त्यांच्या जीवनातून राष्ट्रप्रेम, त्याग आणि संघर्षाची प्रेरणा घेण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले. कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाराणा प्रताप यांच्या कार्याचा आदर्श समाजाने जपला पाहिजे, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले. महाराणा प्रताप जयंतीनिमित्त पैठण शहरात भक्तिमय व उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. त्यांच्या कार्याला विनम्र अभिवादन करून उपस्थितांनी जयंती उत्साहात साजरी केली.

## विद्यार्थ्यांनी अभ्याससोबत शिस्त, स्वच्छता, नियोजन, आणि चांगले संस्कार आत्मसात करावेत- डॉ. संदीप येंडे



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**शेवगाव–** शिक्षण हा विद्यार्थ्यांच्या जीवनातील यशाचा पाया आहे. विद्यार्थ्यांनी नियमित अभ्यासासोबतच शिस्त, स्वच्छता, वेळेचे नियोजन आणि चांगले संस्कार आत्मसात करावेत असे शेवगावच्या रेणुका हॉस्पिटलचे संचालक डॉक्टर संदीप येंडे यांनी सांगितले. नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभा निमित्त कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाच्या प्राथमिक विद्यामंदिर निर्मल नगर येथे प्रवेशोत्सव सोहळ्यात डॉक्टर संदीप येंडे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत होते.

कर्मयोगी आबासाहेब काकडे प्राथमिक विद्यामंदिर येथे इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांचे औक्षण करून जल्लोषात स्वागत करण्यात आले तसेच विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकाचे वितरण करण्यात आले कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेचे निरीक्षक बळवंत शिंदे होते प्रमुख पाहुणे म्हणून डॉक्टर संदीप येंडे, डॉक्टर सीमा येंडे, डॉक्टर पुरुषोत्तम बिहानी, पालक प्रतिनिधी हुशार दहिवाळ तसेच मुख्याध्यापिका परविन पटेल आदी उपस्थित होते. राष्ट्रगीत, राज्यगीत आणि प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी डॉक्टर संदीप येंडे यांनी मुलांना मार्गदर्शन केले पालकांनी मुलांच्या शिक्षणात सक्रिय सहभाग घेत त्यांना प्रोत्साहन दिल्यास त्यांचे भवितव्य अधिक उज्वल होऊ शकते, शिक्षणामुळेच समाजात सकारात्मक परिवर्तन घडवू शकते अशेही यावेळी त्यांनी सांगितले इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांना स्माईली, पेन्सिल, फुगे व चॉकलेट देऊन डॉक्टर संदीप आणि डॉक्टर सीमा येंडे यांनी त्यांचे स्वागत केले त्यामुळे चिमुकल्यांचा आनंद अत्यंत द्विगुणीत झाला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंगेश वसावे यांनी केले प्रवेशोत्सव यशस्वी करण्यासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

**सामाजिक बांधिलकी जपणारे कार्य**

**डॉक्टर संदीप येंडे आणि सीमा येंडे हे दाम्पत्य शेवगाव येथील रेणुका हॉस्पिटलचे संचालक आहेत. हॉस्पिटल सेवेबरोबरच या दाम्पत्यांनी आजपर्यंत सामाजिक बांधिलकी जपण्याचे मोलाचे कार्य केले आहे. आणि करत आहेत, वैद्यकीय सेवेबरोबरच सामाजिक आरोग्य जागृती करण्यास या दोघांचा सक्रिय सहभाग आहे, ते अहमदनगर जिल्हा स्त्रीरोग संघटनेचे कार्यकारिणी सदस्य म्हणून कार्यरत होते, त्यांच्या कार्यकाळात विविध आजारांवर विशेषतः महिलांसाठीच्या आजारावर त्यांनी विविध उपक्रम राबवून आरोग्य शिबिरे आयोजित केली होती आणि सध्याही अनेक शिबिरे आयोजित करत आहेत.**

## पर्यावरणाचा समतोल राखण्याकरिता सहकार्य आवश्यक – ॲड.धनंजय जाधव



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पर्यावरणाचा समतोल राखण्याकरिता सर्वांचे सहकार्य आवश्यक असून ग्रीन सिटी अंतर्गत शहर सुशोभित करण्याचा संकल्प केला असल्याचे श्री.धनंजय जाधव उपमहापौर यांनी सांगितले.ग्रीन सिटी कार्यक्रम नामदार श्री. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात येणार आहे.त्यामुळे मराठी मिशन अंतर्गत बॉईज हायस्कूल ,क्लेरा ब्रूस आणि अध्यापक विद्यालयात वृक्ष लागवड करण्याकरिता सर्व सहकार्य करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यांप्रसंगी सीएसआरडी संचालक डॉ. सुरेश पठारे यांनी उपमहापौर श्री.धनंजय जाधव यांचा सत्कार करून संस्थेचे माहिती दिली.माजी विद्यार्थी श्री रफिक मुन्शी यांनी संस्थेने यापूर्वी पारगाव, जांब, कोल्हेवाडी येथे शिबीर घेऊन वृक्षारोपण केले असून ती गावं विद्यार्थी वर्गाने दत्तक घेऊन योग्य ते संवर्धन केले असल्याचे सांगितले.सत्कार कार्यक्रमानंतर स्वतः उपमहापौर यांनी बॉईज हायस्कूल येथे भेट देऊन जागेची पाहणी केली.श्री.वाघमारे सर यांना ग्रीन सिटी कार्यक्रमात समनव्य ठेवण्याच्या सूचना डॉ.सुरेश पठारे यांनी देऊन सर्व उपस्थितांचे आभार मानले.

## ५६ भोगांची आकर्षक सजावट, धोंडे जेवण व आमरस महाप्रसादाचा हजारो भाविकांनी घेतला लाभ

# आ.अक्षय कर्डिले यांची पेढे तुला करून सत्कार; धार्मिक आणि सामाजिक एकात्मतेचा संदेश

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** बुऱ्हाणनगर येथील प्राचीन आणि जागृत श्री बाणेश्वर देवस्थान आहे. अति प्राचीन असलेल्या याच मंदिरामध्ये प्रभू रामचंद्र वनवासात मार्गस्थ असताना स्वतः येऊन येथील श्री बाणेश्वर भगवंताच्या शिवलिंगाची पूजा करून गेले आहेत अशी आख्यायिका आहे व अशा पवित्र व प्राचीन ठिकाणी आज अनेक प्रकारचे उत्सव होत आहेत त्याच पैकी एक उत्सवात म्हणजे अधिक ज्येष्ठ अमावास्या, त्यानिमित्त आयोजित करण्यात आलेला 'पुरुषोत्तम मास विशेष' धार्मिक सोहळा मोठ्या उत्साहात, भक्तिभावात आणि धार्मिक वातावरणात संपन्न झाला. श्री बाणेश्वर भगवान आणि आदिशक्ती माता पार्वती यांच्या चरणी आयोजित करण्यात आलेल्या या विशेष कार्यक्रमाला परिसरातील तसेच पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी उपस्थिती लावत दर्शन, पूजा-अर्चा आणि विविध धार्मिक उपक्रमांचा लाभ घेतला.

अधिक मासाचे धार्मिक महत्त्व लक्षात घेऊन आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात ५६ भोगांची भव्य आणि आकर्षक सजावट करण्यात आली होती. विविध प्रकारच्या नैवेद्यांनी सजलेले हे ५६ भोग भाविकांसाठी विशेष आकर्षणाचे केंद्र ठरले. मंदिर परिसर दिवसभर भक्तांच्या गर्दीने फुलून गेला होता. भाविकांनी श्री बाणेश्वर आणि माता पार्वतीचे दर्शन घेत श्रद्धाभावाने पूजा-अर्चा केली आणि आध्यात्मिक समाधानाचा अनुभव घेतला.

श्री बाणेश्वर देवस्थानाबद्दल अपार श्रद्धा असलेले स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या प्रेरणेतून या ठिकाणी वर्षभर विविध धार्मिक कार्यक्रम लोकसहभागातून मोठ्या उत्साहात आयोजित केले जातात. यामध्ये श्री दत्त प्रकटोत्सव, श्री हनुमान जयंती, श्री शनि जयंती



तसेच संपूर्ण एकनाथनगर आणि पंचक्रोशीला मंत्रमुग्ध करणारा श्री महाशिवरात्री उत्सव विशेष उल्लेखनीय आहे. या सर्व कार्यक्रमांमध्ये हजारो भाविकांचा सहभाग असतो आणि भक्तीमय वातावरणात हे सोहळे पार पडतात. श्री बाणेश्वर देवस्थानात येणाऱ्या प्रत्येक भाविकाला भगवान बाणेश्वरांच्या कृपेची आणि साक्षात्काराची अनुभूती मिळते, अशी श्रद्धा भाविकांमध्ये आहे.

याच भक्तीभावनेतून आणि श्रद्धेतून श्री बाणेश्वर भक्त मंडळाच्या वतीने धोंडे जेवण व आमरस महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या महाप्रसादाचा लाभ हजारो भाविकांनी घेतला. धार्मिक वातावरणात पार पडलेल्या या उपक्रमामुळे मंदिर परिसर अक्षरशः भक्तिरसाने न्हाऊन निघाला होता. भाविकांनी मोठ्या उत्साहाने महाप्रसादाचा लाभ घेत धार्मिक एकात्मतेचे दर्शन घडविले.

यावेळी नगर-राहुरी-पाथर्डी मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार अक्षय शिवाजीराव कर्डिले यांची विक्रमी मताधिक्याने आमदारपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. युवा उद्योजक विनायक रावसाहेब कर्डिले आणि जयराम बाळासाहेब वाघ यांच्या वतीने आमदार कर्डिले यांची पेढे तुला करण्यात आली तसेच भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी त्यांचा यथोचित गौरव करत पुढील राजकीय आणि सामाजिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी गुरुवर्य राजाभाऊ कोठारी (मंगल सेवा भक्त मंडळ), युवा नेते संदीपदादा कर्डिले, गावचे आदर्श सरपंच रावसाहेबजी कर्डिले, उपसरपंच जालिंदर जाधव, माजी उपसरपंच बाळासाहेब वाघ, पैलवान देविदास कर्डिले, युवा उद्योजक रवीशेठ कर्डिले, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक दत्ताभाऊ तापकिरे, काळभैरवनाथ देवस्थान अध्यक्ष बलभीम कराळे, चेअरमन रंभाजी कर्डिले, युवा उद्योजक सुनील कर्डिले यांच्यासह सर्व ग्रामपंचायत सदस्य, सेवा संस्था सोसायटी सदस्य, गावातील ज्येष्ठ नागरिक, तरुण मित्रमंडळ, महिला भगिनी, विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, ग्रामस्थ आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ.विखे पाटिल कृषी महाविद्यालयाचा कृषी जागरूकता कार्यक्रमाचे नांदगाव येथे आयोजन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** विळद घाट येथील डॉ.विठ्ठलराव विखे पाटील कृषि महाविद्यालयाचे अहिल्यानगर तालुक्यातील नांदगाव येथील शेतक-यांना शेतीविषयक मार्गदर्शन करण्यासाठी तसेच कृषिदूत ग्रामीण कृषी जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून अडीच महिना नांदगाव गावात हे कृषीदूत ग्रामीण कृषि जागरुकता कार्यानुभव कार्यक्रम राबविणार असून १० आठवडे चालणाऱ्या या कार्यक्रमात विविध प्रकारच्या प्रात्यक्षिकांची माहिती कृषिदूत देणार आहेत.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ संलग्न डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषि महाविद्यालय विळद घाट येथे हे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ.सोमेश्वर राऊत, कार्यक्रम समन्वयक प्रा.किरण दांगडे, कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ.दीपिका मावळे तसेच विविध विषयांचे विशेषतज्ञ यांच्या मार्गदर्शनाखाली कृषिदूत सुयोग सोनवणे , आदित्य झराड, प्रेम तुपकर, आदित्य शेलार, अजिंक्य तळेकर, यश ताम्हाणे आणि कार्तिक सुरडकर येथील शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. हे कृषिदूत पुढील कालावधीत शेतकऱ्यांचे अनुभव जाणून शेतक-यांशी आणि गावकऱ्यांशी संवाद साधणार आहेत. या कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत शेतातील माती परीक्षण, फळबाग लागवड, सेंद्रिय शेती, बीज प्रक्रिया, एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन, शेतातील अवजारांचा वापर, शेतीचे आर्थिक नियोजन, जनावरांचे लसीकरण आदी विषयांवर ग्रामस्थांशी चर्चा व शेतकऱ्यांना मार्गदर्शन होणार आहे. या कार्यक्रमासाठी सरपंच सखाराम सरक,उपसरपंच मीराबाई कोळेकर, ग्रामसेवक निकिता पिंपळे, कृषि सहाय्यक ज्योती पाचारणे व सर्व ग्रामपंचायत सदस्य आणि सर्व शेतकरी उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती प्राचार्य डॉ.सोमेश्वर राऊत यांनी दिली.

# पाथर्डी– शेवगाव मतदारसंघात मनसेच्या पक्षबांधणीला वेग; नयन कदम यांचे कार्यकर्त्यांना एकजुटीचे आवाहन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**खरवंडी कासार–** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सरचिटणीस तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे संपर्कप्रमुख मा. नयन कदम साहेब यांनी पाथर्डी-शेवगाव विधानसभा मतदारसंघाचा पक्षबांधणी दौरा करून कार्यकर्त्यांशी संवाद साधला. यावेळी पाथर्डी तालुक्यातील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पदाधिकारी व महाराष्ट्र सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दौऱ्यादरम्यान मनसेचे तत्कालीन जिल्हाध्यक्ष स्वर्गीय देविदास खेडकर यांच्या पाथर्डी येथील निवासस्थानी नयन कदम यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी खेडकर कुटुंबीयांशी संवाद साधत देविदास भाऊ यांनी पक्ष संघटन वाढीसाठी घेतलेल्या परिश्रमांची आठवण करून दिली. तसेच त्यांच्या अपूर्ण राहिलेल्या स्वप्नांना पूर्णत्व देण्यासाठी कुटुंबीयांनी व कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करावे, अशी भावना व्यक्त केली. अहिल्यानगर जिल्ह्यात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची संघटनात्मक बांधणी मजबूत करण्यासाठी नयन कदम सातत्याने प्रयत्नशील असून ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधून पक्षविस्ताराचे काम करत आहेत. युवकांना पक्षाशी जोडणे, स्थानिक प्रश्नांवर प्रभावीपणे आवाज उठवणे आणि सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या शासनापर्यंत पोहोचवणे यासाठी ते विशेष प्रयत्न करत असल्याचे कार्यकर्त्यांनी सांगितले.

त्यांच्या मार्गदर्शनामुळे जिल्ह्यातील मनसेच्या संघटनात्मक कामकाजाला नवी दिशा मिळत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना नयन कदम म्हणाले, ''गट-तट विसरून पक्षाच्या मजबुतीसाठी काम करा. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला पुन्हा चांगले दिवस आणण्यासाठी सर्वांनी एकदिलाने प्रयत्न करावेत. संघटन मजबूत असेल तर जनतेचे प्रश्न अधिक प्रभावीपणे मांडता येतील.'' यावेळी मा. अवधूत चव्हाण (उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य), मा. जातीन पवार (शाखाध्यक्ष, मागासवर्गीय विधानसभा गट क्र. १२), मा. रोहित जगताप (उपशाखाध्यक्ष, मागासवर्गीय विधानसभा गट क्र. १२), अविनाश पालवे, संतोष जिरेसाळ, अशोक आंधळे दादा डांगे प्रल्हाद कीर्तने, एकनाथवाडी सोसायटीचे चेअरमन शहादेव खेडकर बाळू आबा खेडकर सहदेव जाधव महादेव तांदळे महादेव खेडकर शहादेव रावसाहेब खेडकर, बाळासाहेब खेडकर यासह यांच्यासह भगवानगड परिसर व पाथर्डी तालुक्यातील पदाधिकारी आणि महाराष्ट्र सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### देविदास भाऊंचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी कुटुंबीयांनी पुढे यावे - नयन कदम

**महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सरचिटणीस तथा अहिल्यानगर संपर्कप्रमुख मा. नयन कदम साहेब यांनी स्वर्गीय देविदास भाऊ खेडकर यांच्या निवासस्थानी भेट देऊन कुटुंबीयांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी देविदास भाऊ यांनी पक्षवाढीसाठी केलेल्या कार्याचा गौरव करत त्यांच्या अपूर्ण राहिलेल्या स्वप्नांना पूर्णत्व देण्यासाठी कुटुंबीयांनी व कार्यकर्त्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. खेडकर कुटुंबीयांच्या वतीने नयन कदम यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी देविदास भाऊ यांच्या कार्याला अभिवादन करत त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा निर्धार व्यक्त केला.**

या दौऱ्यामुळे पाथर्डी-शेवगाव मतदारसंघातील मनसेच्या संघटनात्मक कामकाजाला नवी ऊर्जा मिळाली असून आगामी काळात पक्ष अधिक जोमाने कार्यरत राहणार असल्याचा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

# पुणे–शिर्डी थेट रेल्वे सेवेला हिरवा कंदील

**खासदार नीलेश लंके यांच्या पाठपुराव्याला अखेर यश । लाखो प्रवाशांची दीर्घकालीन मागणी पूर्ण । शिक्षण, आरोग्य, व्यापार आणि धार्मिक पर्यटनाला मिळणार नवी गती**




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पुणे-शिर्डी थेट रेल्वे सेवेचा आज शुभारंभ होताच पुणे, अहिल्यानगर, कोपरगाव आणि शिर्डी परिसरातील नागरिकांच्या अनेक वर्षांच्या प्रतीक्षेला पूर्णविराम मिळाला आहे. राज्यातील दोन महत्त्वाच्या केंद्रांना जोडणारी ही रेल्वे सेवा सुरू झाल्याने प्रवाशांच्या प्रवासाचा वेळ, खर्च आणि गैरसोय मोठ्या प्रमाणात कमी होणार असून या सेवेमुळे धार्मिक पर्यटनासह शिक्षण, आरोग्य आणि व्यापार क्षेत्रालाही मोठी चालना मिळणार आहे. अहिल्यानगर स्थानकावर खा. लंके यांच्या पत्नी राणीताई लंके यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून गाडीचे प्रस्थान करण्यात आले.

या रेल्वे सेवेच्या मंजुरीसाठी आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी खासदार नीलेश लंके यांनी रेल्वे मंत्रालय, वरिष्ठ रेल्वे अधिकारी तसेच लोकसभेच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा केला होता. विविध स्तरांवर केलेल्या प्रयत्नांमुळे अखेर ही सेवा प्रत्यक्षात सुरू झाल्याने नागरिकांमध्ये समाधान आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

पुणे हे राज्यातील प्रमुख शैक्षणिक, औद्योगिक आणि आरोग्य केंद्र मानले जाते. दुसरीकडे शिर्डी हे देश-विदेशातील लाखो साईभक्तांचे श्रद्धास्थान आहे. त्यामुळे या मार्गावर दररोज मोठ्या प्रमाणात विद्यार्थी, नोकरदार, व्यावसायिक, शेतकरी आणि भाविक प्रवास करतात. थेट रेल्वे सेवा उपलब्ध झाल्याने या सर्व घटकांना अधिक सुरक्षित, जलद आणि किफायतशीर प्रवासाचा पर्याय उपलब्ध झाला आहे.

या रेल्वे सेवेचा लाभ केवळ प्रवासी वाहतुकीपुरता मर्यादित राहणार नसून कृषी व व्यापारी क्षेत्रालाही त्याचा मोठा फायदा होणार आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनांच्या बाजारपेठांशी अधिक प्रभावी संपर्क साधता येणार असून व्यापारवृद्धीलाही चालना मिळेल. तसेच उपचारासाठी पुण्यात जाणाऱ्या रुग्णांना आणि त्यांच्या नातेवाईकांना या सेवेचा विशेष लाभ होणार आहे.

खासदार नीलेश लंके यांनी लोकसभेत अहिल्यानगर जिल्ह्यातील रेल्वेसंदर्भातील विविध प्रश्न सातत्याने मांडले आहेत. पुणे-शिर्डी थेट रेल्वे सेवा सुरू करण्यासाठी त्यांनी रेल्वेमंत्र्यांची भेट घेऊन अनेकदा पाठपुरावा केला होता. आज त्या प्रयत्नांना यश मिळाल्याने जिल्ह्यातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

काही पूर्वनियोजित कार्यक्रमांमुळे खासदार लंके यांना शुभारंभ सोहळ्यास प्रत्यक्ष उपस्थित राहता आले नाही. त्यांच्या अनुपस्थितीत त्यांच्या पत्नी राणीताई लंके यांनी हिरवा झेंडा दाखवून गाडीचे शिर्डीकडे प्रस्थान झाले. खा. लंके यांनी त्यांनी शुभेच्छा देताना विकासाभिमुख कामांसाठी आपला संघर्ष आणि पाठपुरावा यापुढेही कायम राहील, असा विश्वास व्यक्त केला आहे.

जनतेच्या मागण्यांना न्याय मिळवून देणे हेच माझे कर्तव्य आहे. अहिल्यानगर जिल्ह्याच्या रेल्वे, रस्ते, आरोग्य आणि सर्वांगीण विकासाशी संबंधित प्रत्येक प्रश्नासाठी मी सातत्याने प्रयत्नशील राहणार आहे,'' असे खासदार नीलेश लंके यांनी सांगितले.

(पान १ वरून)

### कवडे मळा खून प्रकरणाचा एलसीबीकडून छडा

(वय २२, रा. देवळाली प्रवरा, राहुरी) व विशाल ऊर्फ रानटी रामचंद्र उमाप (वय १८, रा. विळदघाट, मूळ पाथर्डी) अशी अटक आरोपींची नावे आहेत. दिनांक १५ जूनच्या रात्री ११ ते १६ जून रोजी पहाटे ३ वाजेच्या सुमारास नगर-कल्याण रोडवरील जाधव मळा (कवडे मळा) येथे ही घटना घडली होती. मूळचे शेवगाव तालुक्यातील काळेगाव अमरापूर येथील रहिवासी असलेले लक्ष्मण मार्तंड काळे हे आपल्या नातेवाईकांच्या शेडबाहेर व-हांड्यात झोपलेले असताना, अज्ञात इसमांनी त्यांच्यावर कुऱ्हाडीने वार करून त्यांची निर्घृण हत्या केली. तसेच त्यांच्या पत्नीवरही वार करून त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम १०३(१) आणि १०९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांना तात्काळ तपासाचे आदेश दिले. त्यानुसार सपोनि हरीश भोये व पोलीस अंमलदारांचे विशेष पथक रवाना करण्यात आले. तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे, संशयित आरोपी देहेरे गावातील खंडोबाचा मळा येथे लपल्याची खात्रीशीर माहिती पथकाला मिळाली. पोलिसांनी तात्काळ तिथे वेढा घालून चार जणांना ताब्यात घेतले.

### मतदारसंघात आल्यास खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांची धिंड काढू...

मतदारसंघात फिरू देणार नसल्याचा ठाकरे गटाच्या जिल्हाप्रमुखासह शिवसैनिकांचा इशारा दिला आहे.

मतदारसंघात आल्यास खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांची धिंड काढू असा संतप्त पवित्रा शिवसैनिकांनी घेतला असून भाऊसाहेब वाकचौरे यांनी वेळोवेळी साईबाबांच्या शपथी खोट्या घेतल्या. आम्ही या गद्दार भाऊसाहेब वाकचौरे ला धडा शिकवल्याशिवाय शांत बसणार नाही... शिवसैनिकांचे दोन रंग असतात आम्ही खांद्याला खांदा लावून जनतेची सेवा करतो , गद्दारी केल्यास जागाही दाखवतो... असे म्हणत शिवसैनिकांशी वैर त्यांना परवडणार नसल्याचे शिवसैनिकांनी म्हटले.

### शहरात विद्यार्थिनींसाठी अद्ययावत वस्तीगृह उभारण्यासाठी जागेची मागणी

शिवाय सुरक्षिततेची हमी नसते. विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना सुरक्षित आणि शैक्षणिक वातावरणात राहण्याची सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी माध्यमिक शिक्षक सोसायटीने स्वतंत्र वस्तीगृह उभारण्याचा संकल्प केला आहे. या वस्तीगृहामध्ये आधुनिक सुविधा, सुरक्षित निवास, अभ्यासिका, ग्रंथालय तसेच विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. या प्रकल्पासाठी नगर शहराच्या लगत असलेल्या मोकळ्या जागेत १० ते १५ गुंठे जागा उपलब्ध करून देण्यात यावी, अशी मागणी आमदार संग्राम जगताप यांच्याकडे करण्यात आली. शिक्षणासाठी शहरात येणाऱ्या विद्यार्थिनींना यामुळे मोठा आधार मिळेल तसेच त्यांच्या पालकांनाही दिलासा मिळणार असल्याचे सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांनी नमूद केले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी मुलींच्या शिक्षणासाठी सुरक्षित निवास व्यवस्था ही काळाची गरज असल्याचे सांगितले. ग्रामीण भागातील होतकरू विद्यार्थिनींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी अशा वस्तीगृहांची आवश्यकता असून, हा प्रकल्प सामाजिकदृष्ट्याही महत्त्वाचा ठरणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

### कल्याण रोड परिसरात वाढत्या घरफोडी व गुन्हेगारीमुळे पोलीस गस्त वाढवा

आणखी भीती निर्माण झाली असून संबंधित प्रकरणात कठोर आणि प्रभावी कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

परिसरातील कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी नियमित पोलीस पेट्रोलिंग वाढविणे, रात्रीच्या वेळी विशेष गस्त पथके तैनात करणे, संशयास्पद हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवणे तसेच आवश्यक त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविणे गरजेचे आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने पोलीस प्रशासनाने तातडीने उपाययोजना करून नियमित गस्त वाढवावी, अशी मागणी निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

### जामखेड बनावट दूध रॅकेट, सात अटकेत

कृत्रिम दूध तयार करून त्याची विक्री केल्याचे, तर काहींनी त्याचे संकलन व वितरण केल्याचेही समोर आले आहे..

दरम्यान, गुन्ह्याचा तपासात सात जणांविरोधात सुमारे ८५० पानी दोषारोपपत्र जामखेड न्यायालयात दाखल करण्यात आले आहे. अटक करण्यात आलेल्यांपैकी चौघांना जामीन मिळाला असून तिघे आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत. नव्या कारवाईनंतर या प्रकरणातील अटक आरोपींची संख्या १४ वर पोहोचली आहे. अद्याप २७ संशयित पसार असून त्यांना अटकपूर्व जामीन मिळालेला नसल्याची माहिती सूत्रांनी दिली. त्यामुळे येत्या काळात आणखी अटकसत्र सुरू होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या गुन्ह्यात आणखी आरोपींची संख्या वाढण्याची शक्यता असून, बनावट दुधाचा ओघळ नाशिक, छत्रपती संभाजीनगर, बीड, पुणे जिल्ह्यात जाण्याची शक्यता आहे